# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र,मुंबई

जुने प्रशासकीय महाविदयालय आवार, रुम नं.1,2,5 व 6, हजारीमज सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,मुंबई-400 001.

| E-mail : mah-sforum@nic.in | टेलि.फॅक्स क्र. : २२०१ ८५ ३९ | दुरध्वनी क्र. २२०५ ७४ ०९ |
|---|---|---|

जा.क्र.राआ/लेखा/शा.नि./प्रा.का.प्रमुख/2015/1665 दिनांक 24/02/2015

प्रति,

1) प्रबंधक(विधी),
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र, मुंबई
यांचे परिक्रमा खंडपीठ,औरंगाबाद/नागपुर.

2) प्रबंधक,
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,
सर्व जिल्हे.

विषयः-ग्राहक संरक्षण अधिनियम,1986 राज्य आयोगाच्या अधिनस्त कार्यालयांसाठी ज्येष्ठतम न्यायिक सदस्यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्याबाबत.

संदर्भः-अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णयक्रमांक संकीर्ण-1814/ प्र.क्र.61/ग्रासं.4 दिनांक 20 फेब्रुवारी 2015.

उपरोक्त संदर्भाकित शासन निर्णयान्वये ग्राहक संरक्षण अधिनियम,1986 राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या मुंबई, नागपुर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयाचे प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी ज्येष्ठतम न्यायिक सदस्यांना **प्रादेशिक कार्यालय प्रमुख** म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

याच अनुषंगाने सदरच्या शासन निर्णयाची प्रत यासोबत आपले माहिती व उचित कार्यवाहीस्तव यासोबत पाठविण्यांत येत आहे. संबंधित प्रकरणी उक्त शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करावे.

मा.अध्यक्ष,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र,मुंबई यांचे पुर्वमान्यतेने.

24/02/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक (विधी),
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र,मुंबई.

प्रत-

1) मा.श्री.एस.एम.शेंबोळे, ज्येष्ठतम न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र, मुंबई यांचे परिक्रमा खंडपीठ, औरंगाबाद.
2) मा.श्री.बी.ए.शेख, ज्येष्ठतम न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र, मुंबई यांचे परिक्रमा खंडपीठ, नागपुर.
3) मा.सौ.उषा एस.ठाकरे, ज्येष्ठतम न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई
4) मा.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
5) मा.जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व जिल्हा कोषागार कार्यालय.
6) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई, आस्थापना/लेखा शाखा.

Office exp.

**<u>ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६</u> राज्य आयोगाच्या अधिनस्त कार्यालयांसाठी ज्येष्ठतम न्यायिक सदस्यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय:- क्रमांक संकीर्ण- १८१४/प्र.क्र. ६१ /ग्रासं. ४**
**मंत्रालय ,मुंबई - ४०० ०३२.**
दिनांक:- २० फेब्रुवारी २०१५

<u>वाचा</u>:- (१ ) शासन निर्णय अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक- ग्रासंक २२१० / प्र.क्र.२६६ /ग्रा.सं.३ दि. १६ नोव्हेंबर २०१३

(२ ) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक विअप्र १००८/प्र.क्र. ७०/२००८ विनियम, दि.१५ मे २००९

(३ ) रा.ग्रा.त.नि.आयोगाचे पत्र क्र.राआ/आस्था/ प्राविप्र./२०१४/१०२३/ दि. १४/२/२०१४

**<u>प्रस्तावना :</u>**

ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६ मधील तरतुदीनुसार राज्यात ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी राज्यस्तरीय राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबई येथे तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाची स्थापना करण्यात आली आहे.तसेच सदर नियमातील सुधारित तरतुदीनुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाची परिक्रमा खंडपीठे स्थापन केली आहेत.त्याचप्रमाणे उक्त वाचा क्र.(१ ) नुसार ग्राहक संरक्षण यंत्रणा व वैधमापन शास्त्र विभागातील संवर्ग स्वतंत्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्य आयोगाने वरील संदभीर्य दिनांक १४.२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या मुंबई, नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयाचे प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी ज्येष्ठतम न्यायिक सदस्यांस प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्याची विनंती केली आहे.

**<u>शासन निर्णय</u>**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या मुंबई, नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयासाठी ज्येष्ठतम न्यायिक सदस्य यांना प्रादेशिक कार्यालयप्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे. या सर्व कार्यालयांच्या प्रशासकीय कामकाजासाठी मुंबई वित्तिय अधिकार नियम पुस्तिका भाग पहिला उपविभाग एक,अनु क्र.२, नियम क्र. २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन ज्येष्ठतम न्यायिक सदस्य,राज्य आयोग मुंबई,नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ यांना **"प्रादेशिक कार्यालय प्रमुख"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.सदर अधिकार हे वित्तिय बाबी पुरते मर्यादित राहतील.

२. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौ सं.क्र. ५५८/१४ विनियम, दिनांक ९.१०.२०१४ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१५०२२११४५१४२२९०६ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

POTE SHUBHANGI ASHAY

Digitally signed by POTE SHUBHANGI ASHAY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD. CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION,CID - 917983, postalCode=400032, st=Maharashtra, cn=POTE SHUBHANGI ASHAY
Date: 2015.02.21 15:12:26 +05'30'

**( शुभांगी पोटे )**
कार्यासन अधिकारी,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) मा. मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
४) मा. राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.)यांचे खाजगी सचिव,
५) महालेखापाल -महाराष्ट्र राज्य,१/२ मुंबई /नागपूर,
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८) सामान्य प्रशासन विभाग /कार्यासन-१२, मंत्रालय, मुंबई -३२
९) वित्त विभाग, विनियम /व्यय-४,मंत्रालय, मुंबई -३२
१०) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
११) प्रबंधक,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबई
१२) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच ( सर्व )
१३) परिक्रमा खंडपीठ नागपूर /औरंगाबाद,
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी